# मोंटू ची हत्या होत असताना पळाला म्हणून अजय ला संपविले



## स्मशानभूमीतूनच केले होते अपहरण

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.10 )** - बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अंजनगाव बारी रस्त्याजवळील जंगल परिसरात अजय वानखडे नावाच्या तरुणाची हत्या करण्यात आली. याप्रकरणातील गुन्हे शाखा युनिट क्र. 1 च्या पथकाने 3 आरोपींना अटक केली आहे. ज्यामध्ये यात एका अल्पवयीन मुलाचाही समावेश आहे. मृतक अजय वानखडे आणि तिन्ही आरोपी हे एकमेकांचे ओळखीचे आणि मित्र होते. परंतू मोंटू गोलेच्या हत्येच्यावेळी अजय वानखडे हा घटनास्थळावरून पळून गेला, त्यामुळे मोंटूची हत्या झाली, असा संशय आरोपींना होता. त्यामुळे त्यांनी मोटु गोलेच्या अंत्यसंस्कारावेळी अजय वानखडेला दुचाकीवर बसून त्याचे अपहरण केले आणि त्यानंतर त्याची बडनेरा हद्दीत हत्या करण्यात आली. ही बाब पोलिस तपासात पुढे आली आहे.

जयस्तंभ चौकात हत्या झालेल्या प्रेमराज उर्फ मोंटू गोले याच्यावर 7 ऑक्टोंबर रोजी हिंदू स्मशान भूमीत अंत्यसंस्कार पार पडले. यावेळी या हत्या प्रकरणातील फिर्यादी अजय विजय वानखडे (25,रा. खडकाडीपूरा) हा आपल्या आकाश उर्फ अवलाई वसंत चव्हाण, गणेश उर्फ बंटी शिंदे व गणेश शिंदे या मित्रांसह तेथे हजर होता. या मित्रांनी अजयला गाडीवर बसवून अंजनगाव बारी मार्गावरील राम मेघे महाविद्यालयाच्या शेताजवळ नेले आणि तेथे त्याला धारदार शस्त्राने जिवानीशी ठार मारले. या गुन्हातील आरोपी आकाश उर्फ अवलाई हा रेकॉर्डवरिल कुख्यात आरोपी असून तो नेहमी स्वतःचे राहण्याचे ठिकाण बदलविण्यात पटाईत आहे. तो बरेच वेळा सातारा व मुंबई व इतर ठिकाणी मुक्कामाला असतो तसेच घटनेच्या वेळी त्याच्या सोबत असलेला आरोपी गणेश शिंदे हा सातारा जिल्ह्यातील मूळ रहिवाशी असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून गुन्हे शाखेच्या पोलिसांनी आरोपींना अटक केली. 8 ऑक्टोंबर रोजी गौरव विलासराव पाटील (25, रा. हनुमान नगर, खोलापूरी गेट) यांनी बडनेरा पोलिसात या हत्येची तक्रार दिली होती.

### वेष बदलून पकडला आरोपी

पोलिसांना माहिती मिळाली की, आकाश उर्फ अवलाई हा आपले अस्तित्व लपवून तोंडाला रूमाल बांधून हमालपूरा भागात फिरत आहे. या माहीतीवरून पोलिसांनी वेष बदलवून हमालपूरा भागात सापळा रचला, मात्र ताब्यात घेण्यापुर्वीच आरोपी हा हमालपूरा येथील अंरूद गल्ली बोळांतून गर्दीचा फायदा घेत तेथून पळून गेला. साधारतः तास ते दोन तास आरोपी आकाश उर्फ अवलाई हा पोलीसांना हुलकावणी देत होता. परंतू अखेर पोलिसांनी त्याला घेराव घालून शिताफीने ताब्यात घेतले. पोलिसांनी आकाशची चौकशी केली असता, सदर गुन्हात निखील ठाकरे (रा. राजूरा), सलमान उर्फ तुफान अप्पू खान (रा. हैदरपूरा) व एक विधीसंघर्षग्रस्त बालक असल्याची माहिती पुढे आली. आकाशला बडनेरा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

# 786 सीरिजच्या 2.49 लाख रुपयांच्या नोटा लंपास

## रितेश बुब यांच्या घरी चोरी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 10 )** - गाडगेनगर पोलिस स्टेशन हद्दीतील गणेश किंग सर्कल अपार्टमेंट, कॅम्प रोड येथे राहणारे वैद्यकीय व्यावसायिक रितेश गणेशदास बुब यांच्या घरातून एका संशयित महिलेने विशेष मालिका क्रमांक 786 च्या 2 लाख 49 हजार रुपयांच्या नोटा चोरल्या. ज्यामध्ये 50, 100, 200, 500, 10, 20 रुपयांच्या नोटांचे बंडल होते. रितेश बुबच्या तक्रारीवरून पोलिसांनी समाधान नगर येथील एका संशयित महिलेविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

रितेश बूबला स्पेशल सीरीज नंबर नोट्स जमा करण्याचा छंद आहे. त्यांनी 786 क्रमांकाच्या विशेष नोटांचे बंडल बनवून बेडरूममध्ये असलेल्या लोखंडी कपाटाच्या लॉकरमध्ये ठेवले होते. लॉकरची चावी ते मनीपॉकेटमध्ये ठेवत होते. 4 ते 9 ऑक्टोबर दरम्यान काही अज्ञात व्यक्तींनी लॉकरमधून 2 लाख 49 हजार रुपयांच्या विशेष सीरिजच्या नोटांचे बंडल चोरले. त्यानंतर जेव्हा रितेश बुबने त्याच्या आईला विचारले तेव्हा तिने सांगितले की, संशयित महिलेशिवाय घरात कोणीही आले नाही. रितेश बूबच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी संशयित महिलेविरुद्ध कलम 306 बीएनएस अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# रोड रोमियोला कंटाळून तरुणीची आत्महत्या

**चिखलदरा येथील घटना**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 10 )** - चिखलदरा पोलीस स्टेशन हद्दीत राहणारा 15 वर्षीय अल्पवयीन मुलीने एका अल्पवयीन मुलाच्या त्रासापाई आत्महत्या केली. याप्रकरणात आईच्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

हा अल्पवयीन चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणार्या एका 15 वर्षीय मुलीची छेड काढत होता. मुलीशी बोलण्याचा प्रयत्न करायचा. तो तिला वारंवार फोन करून त्रास देत होता. मुलीने बोलण्यास नकार दिला, तरी तो तिचा पाठलाग करून तिला त्रास देत होता. शाळेत जात असताना तो तिचा पाठलाग करीत असल्याने अखेर तिने या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली. त्यामुळे आईच्या तक्रारीवरून चिखलदरा पोलिसांनी अल्पवयीन मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# अमरावतीच्या आरतीचा पुण्यात अपघातीत मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.10 )**- अमरावतीच्या रामपुरी कॅम्प कॉम्प्लेक्समध्ये राहणाऱ्या आरती सुरेश मनवानी (23) हिचा पुण्यातील कर्वे नगर परिसरात अपघाती मृत्यू झाला. आरती मोबाईलवर बोलत असताना पायी रस्ता ओलांडत असताना भरधाव वेगात आलेल्या डंपरने तिला धडक दिली. आरती मनवानी चाकाने चिरडल्याने तिचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या घटनेची माहिती पुण्याच्या अलंकार पोलीस स्टेशनला मिळताच अमरावतीच्या रामपुरी कॅम्प संकुलात शोककळा पसरली आहे. शवविच्छेदन प्रक्रियेनंतर आरतीचा मृतदेह मनवानी कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात आला. अमरावती येथे शोकाकुल वातावरणात तिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आरती मनवानी गेल्या दोन वर्षांपासून पुण्यात राहत होती. ती शिक्षण आणि नोकरीही करीत होती. गेल्या आठवड्यात आरती पुण्याहून अमरावतीला पोहोचली होती आणि 3-4 दिवस कुटुंबासोबत राहिल्यानंतर मंगळवारी 8 ऑक्टोबर रोजीच संध्याकाळी ती अमरावतीहून पुण्याला गेली होती.

# दुचाकी चोरटा गजाआड

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.10 )**- स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने एका दुचाकी चोराला 10 ऑक्टोबर रोजी चांदुररेल्वेतून अटक केली. नरेश प्रेमसिंग जाधव (39, रा. गारपिट, ता. कारंजा घाडगे, जि. वर्धा, ह.मु. मार्डी) असे आरोपीचे नाव असून, त्याच्या ताब्यातून एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे. ग्रामिण भागात शेतातील मोटार, स्पींक्लर चोरी व ईतर शेतातील चोरी करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार चेक करण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चांदुर रेल्वे हद्दीत पेट्रोलींग करीत होते. दरम्यान माहिती मिळाली की, चांदुर रेल्वे येथे दुचाकी चोरी गेल्याची तक्रार दाखल होत आहे. या माहितीवरून पोलिसांनी तपास सुरु केला असता, चांदुर रेल्वे येथे एक ईसम विना क्रमांकाची दुचाकी घेऊन पचायत समीती समोर उभा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरून पोलिसांनी त्याला दुचाकीसह ताब्यात घेतले. त्याने नरेश प्रेमसिंग जाधव असे सांगितले. पोलिसांनी त्याची कसून चौकशी केली असता, त्याने जुन महीन्यात चांदुर रेल्वे येथुन दुचाकी चोरी केल्याचे कबुली दिली.




आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# राजकीय पक्षांचा 'युज अँड थ्रो' देवेंद्र भुयारांकरिता घातक!

**आगामी विधानसभा निवडणूकीत बिकट वाट**

**विलास पाटील**

**वरुड, ( दि.10 )-** तत्कालीन कृषीमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.अनिल बोंडे यांना आकस्मिक झटका देत सन 2019 मध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षामूळे जिल्हा परिषदेचे सदस्य असलेले देवेंद्र भूयार आमदार झाले. विजय संपादनाकरिता त्यांनी त्यावेळी घेतलेले अनेक निर्णयही त्यांच्या पथ्थ्यावर पडले. परंतू त्यांच्याकडे राजकीय पक्षांबद्दलचा असलेला 'युज अँड थ्रो' चा दृष्टीकोन त्यांना आगामी विधानसभा निवडणूकीत चांगलाच घातक ठरणार असल्याचे चित्र आहे. त्यामूळे आगामी विधानसभा निवडणूकीत आ.भूयार यांची विजयाची वाट बिकट दिसत आहे.

तेव्हाच्या आघाडीचे उमेदवार देवेंद्र भुयार यांनी 9 हजार 791 मतांनी डॉ.अनिल बोंडे यांचा पराभव केला. परंतू आमदार झाल्यानंतर देवेंद्र भूयारांनी अवघ्या काही दिवसातच कमरेचा नाळा सोडून ठेवावा तसे स्वाभिमानी शेतकरी संघटनेला आपल्यापासून दूर ठेवले. 'शेतकरी पुत्र' हे स्वयंघोषीत वाक्य आपल्या नावासमोर लावून देवेंद्र भुयार यांनी 96 हजार 152 मते आपल्याकडे वळविण्यात यश मिळविले होते. यावेळी डॉ.अनिल बोंडे यांना 86 हजार 361 मतावर समाधान मानावे लागले होते. चळवळीतील कार्यकर्ते म्हणून भूयार यांची वरूड-मोर्शी विधानसभेमध्ये ओळख होती. त्यांनी सुरुवातीला बच्चू कडू यांची कास धरुन प्रहार या पक्षामध्ये काम केले. काही दिवस काम केल्यानंतर त्यांनी अचानक त्यांनी प्रहारला राम राम ठोकत 'क्रांती संघटना' नावाने स्वत ची संगठना तयार केली. क्रांती संघटनेच्या माध्यमातून त्यांनी वरूड-मोर्शी मतदारसंघात आपली पाळेमूळे



रोवणे सुरु केले. परंतु त्यांची ही योजना निष्क्रीय ठरली. त्यानंतर त्यांनी लगेच 'क्रांती संघटना' नावाच्या दुकानाला कुलूप ठोकून रविकांत तुपकर व अमित आढाऊ यांच्या माध्यमातून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांच्याशी संपर्क केला, आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा पदर पकडला. त्यांनी या संघटनेच्या माध्यमातून आपण शेतकरी हितैषी असल्याचे सांगत संपूर्ण वरूड-मोर्शी विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला. त्यांना स्वाभिमानी शेतकरी संघटनेची उमेदवारी मिळणार हे जवळपास निश्चित झाले असताना राजू शेट्टी यांनी महाविकास आघाडीची साथ धरली आणि महाविकास आघाडीचा उमेदवार म्हणून देवेंद्र भुयार यांना उमेदवारी दिली. त्यासाठी राजू शेट्टी यांनी प्रयत्नाची पराकाष्टा करून देवेंद्र भुयार यांना निवडून आणण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. सुदैवाने माजी आमदार नरेशचंद्र ठाकरे व राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री हर्षवर्धन देशमुख यांनी बोंडेंना पराभूत करण्याकरिता भूयारांच्या डोक्यावर हात ठेवला. त्यातच गोळीबार आणि वाहन जाळपोळ 'स्कीट' या सर्वांचे फलीत होत अपेक्षेप्रमाणे बोंडेंचा करेक्ट कार्यक्रम झाला आणि देवेंद्र भुयार आमदार झाले. मात्र स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजू शेट्टी यांना सोडून भूयारांनी वेगळी भूमिका घेतल्याने शेट्टींनी त्यांना संघटनेतून बाहेर केले, नंतर काही काळातच मतदारसंघांमध्ये काँग्रेस पक्षाच्या विरोधात भूमिका घेऊन नरेशचंद्र ठाकरे यांची साथ सोडली. 'तूची तारु तुची उध्दारु' म्हणत आ.भूयारांनी फक्त हर्षवर्धन देशमुखांनाच आपल्या विजयाचे श्रेय दिले. त्यानंतर राज्याच्या राजकारणामध्ये मोठी उलथापालथ झाली आणि शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेसचेही सुद्धा दोन तुकडे झाले. यामध्ये देवेंद्र भुयार यांची गोची झाली, परंतू सोयीचे आणि सोपे राजकारण करण्याकरिता त्यांनी हर्षवर्धन देशमुख यांच्या सोबत उभे न राहता शरद पवार यांच्या राष्ट्रवादीला पाठ दाखवित अजित पवार यांच्यासोबत जाण्यात धन्यता मानली. अजित पवारांनी आगामी विधानसभेसाठी त्यांची उमेदवारी जाहीर केली आहे. वरुड-मोर्शी मतदारसंघात महत्वाचा आणि महायुतीमधील घटक पक्ष भाजपातीलच काही पदाधिकाऱ्यांकडून आ.भूयारांना प्रचंड विरोध आहे. त्यामूळे आ.भूयार सध्यातरी छिद्र पडलेल्या नौकेत बसलेले आहे, जी आगामी निवडणूकीत बुडण्याच्या तयारीत दिसत आहे.



**अमरावती-** श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ यांना वाढदिवसानिमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, आजीवन सभासद बबनराव चौधरी यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी सौ.काळमेघ व राजू सुंदरकर हे उपस्थिती होते.

# पित्याने कमावले सुवर्ण तर मुलीने रजत

**राष्ट्रीय पोलो स्पर्धेत अंजनगाव सुर्जीच्या पिता-पुत्री चे यश**

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी, ( दि.10 )-** नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय पोलो चॅम्पियनशिप मध्ये अंजनगाव सुर्जी येथील मूळ निवासी व नोकरी मुळे सद्या मध्यप्रदेशात वास्तव्यास असलेले पिता पुत्रीने सुवर्ण व रजत पदकाला गवसणी घालण्याचा विक्रम केला. या यशामुळे अंजनगाव सुर्जीला मानाचा तुरा रोवला गेला आहे.

राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू तयार करण्यासाठी सन 1984 पासून काम करत असलेल्या दिल्ली येथील भारतीय खेळ प्राधिकरणाच्या वतीने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या क्यानोय पोलो चॅम्पियनशिप मध्ये 29 सप्टेंबर ला झालेल्या पोलो स्पर्धेत अंजनगाव सुर्जी येथील वानखडे पेठ सुर्जी चे मूळ निवासी व नोकरीमुळे सद्या मध्यप्रदेशात वास्तव्यास असलेले नंदकुमार सुखदेव वानखडे (वय 41) व त्यांची कन्या मान्या नंदकुमार वानखडे (वय 15) यांनी दिल्ली





येथील भारतीय खेळ प्राधिकरण यांच्याकडून आयोजित करण्यात आलेल्या नवव्या राष्ट्रीय कॅनॉय चॅम्पियनशिप पोलो स्पर्धेत सहभाग घेत नंदकुमार यांनी मध्यप्रदेश कडून खेळत प्रथम क्रमांक पटकावत सुवर्ण पदक प्राप्त केले. त्यांची कन्या मान्या हिने महाराष्ट्राकडून खेळात व्दितीय क्रमांक पटकावित रजत पदक प्राप्त केले.

# जि.प.शाळेत साजरा केला माजी उपसरपंचांचा वाढदिवस

## विद्यार्थ्यांना नोटबुक व पेनाचे वाटप

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.10 )-** 20 टक्के राजकारण व 80 टक्के समाजकारण हे सूत्र बाळगून बेनोडा शहीदचे माजी उपसरपंच गोपाल नांदुरकर यांचा बेनोडा शहीद येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थी शिक्षक शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व ग्रामपंचायत सदस्यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा केला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्ष अरुणा फरकाडे ह्या होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून ग्रामपंचायत सुनीता कोठे, पूजा टेकाम, सदस्य मंगेश हुरडे, विशाखा



दुपारे, दीपिका खुरसंगे, संजय फरकाडे, विलास पाटील, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील पुंड, जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.फुसे शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य विलास महाजन, विजय बारमासे, विशाखा नांदुरकर, यश नांदुरकर, स्वत गोपाल नांदुरकर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना गोपाल नांदुरकर यांचे हस्ते व प्रमुख पाहुण्यांचे हस्ते विद्यार्थ्यांना नोटबुक व पेन भेट देण्यात आले या कार्यक्रमामुळे गावातील नागरिकांनी एका चांगल्या सामाजिक उपक्रमाबद्दल गोपाल नांदुरकर यांचे शुभेच्छा देत स्वागत करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी आपले विचार प्रकट केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्वस्वी शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व शिक्षक वृंद यांनी अथक परिश्रम घेतले.

# 81 रक्तदात्यांनी केले रक्तदान



**■ आशीर्वाद दुर्गात्सव मंडळाचा सामाजिक उपक्रम**

**■ नागरिकांची आरोग्य तपासणी शिबीर**

**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.10 )** - तालुक्यातील विहिगाव येथील आशीर्वाद दुर्गात्सव मंडळाच्या वतीने नवरात्र महोत्सव निमित्त रक्तदान शिबीर व आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिबिरामध्ये 81 रक्तदात्यांनी रक्तदान केले. तर आरोग्य तपासणी शिबिरामध्ये नागरिकांची तपासणी करण्यात आली. या शिबिराचे उद्घाटन विहीगाव सरपंच जयश्री पोटदुखे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. रक्त संकलन करण्यासाठी परतवाडा येथील मेळघाट ब्लड बँक यांनी सहकार्य केले. तर नागरिकांची आरोग्य तपासणी कौस्तुभ पाटील यांच्या उपस्थितीत झाली. शिबीर यशस्वी करण्यासाठी आशीर्वाद दुर्गात्सव मंडळाचे अध्यक्ष आदित्य काळे यांच्यासह मंडळाचे संपूर्ण कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



# ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाचाच झेंडा

## विद्यापीठाचा युवा महोत्सव

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.10 ) -** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव नुकताच 27 ते 30 सप्टेंबर दरम्यान शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला येथे पार पडला. यामध्ये तब्बल 203 महाविद्यालयांनी सहभाग घेतला होता. ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाच्या चमूने 11 कला प्रकारात पारितोषिके पटकावून विद्यापीठात आपला झेंडा कायम ठेवला. रांगोळी, एकांकिका, पाश्चिमात्य एकल गान, पाश्चिमात्य समूह गान, सुगम संगीत, शास्त्रीय संगीत, स्थल चित्रण, चित्र कला, वक्तृत्व स्पर्धा, पाश्चिमात्य वाद्य व पोस्टर पेंटिंग अशा विविध कला प्रकारांमध्ये, प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिके पटकावून ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाच्या चमूने आपली सांस्कृतिक व कलाप्रकाराची प्रचिती देत यश संपादन केले. या चमूमध्ये सहभागी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा गौरव वाढविला. चार दिवस चाललेल्या या युवा महोत्सवामध्ये एकूण 27 कलाप्रकारांपैकी 11 कला प्रकारांमध्ये आपले कर्तब दाखवून या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद कामगिरी केली. अशा या गौरवांकित चमूचे व्यवस्थापन हे डॉ.सागर कुथे व डॉ.मृणाल महाजन, सहाय्यक प्राध्यापक ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय यांच्याकडे होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक धोटे व सुरज हेरे यांचे अमूल्य मार्गदर्शन या चमुला लाभले. सांस्कृतिक स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळालेल्या सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे आणि विजेत्यांचे श्री ब्रिजलाल बियाणी शिक्षा समितीचे अध्यक्ष ओम लढ्ढा व सर्व कार्यकारी सदस्यांनी युवा महोत्सव चमू व व्यवस्थापन अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

# वंचीतला मागणार उमेदवारी -भीमराव कुऱ्हाडे

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि. 10 ) -** अनुसूचित जाती करता राखीव असलेल्या दर्यापूर विधानसभा मतदार संघातून आपल्याला उमेदवारी मिळावी अशी मागणी वंचित बहुजन आघाडीला करणार असल्याचे सामाजिक कार्यकर्ते भीमराव कुऱ्हाडे यांनी सांगितले आहे.

कुऱ्हाडे हे वंचित बहुजन आघाडीचे माजी तालुकाप्रमुख असून त्यांनी अनेक आंदोलनातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली आहे. त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह खुद्द बाळासाहेब आंबेडकर यांना दर्यापूर मतदार संघाची उमेदवारी द्यावी अशी पक्षश्रेष्ठींना केली आहे.



महाविकास आघाडीतील घटक पक्षात असलेल्या काँग्रेस, ठाकरे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस या तीनही पक्षात विधानसभेची उमेदवारी मिळवण्यासाठी चुरस सुरू असून दर्यापूर मतदार संघ हा एकमेव राखीव मतदार संघ असल्यामुळे बाहेररून विविध उमेदवार बाशिंग बांधून आपली उमेदवारी मिळवण्यासाठी प्रयत्नरत झालेले आहेत. यासह महायुती मधील शिंदे गट , भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांनीही उमेदवारी मिळवण्यासाठी दंड थोपटले आहेत. आता बहुजन आघाडीकडून काय राजकीय खेळ खेळला जातो हे पाहण्यासारखे राहील.


## नगर परिषद कार्यालय दर्यापूर जि. अमरावती

न.प. दर्यापूर/आरोग्य विभाग/जा.क्र.४०७६/२०२४ — दि. १०/१०/२०२४

### निविदा सुचना

मुख्याधिकारी नगर परिषद दर्यापूर सन २०२४-२५ करीता इच्छुक निविदाकार मार्फत पुढे नमूद कामाकरीता निविदा आमंत्रित करीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अनामत रक्कम (रू.) | निविदा फॉर्म फी (रू.) |
|---|---|---|---|
| १ | शहरातील कचरा असुरक्षित बिंदू (GVP) निराकरण करणे. | २५०/- | १००/- |
| २ | स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अभियान अंतर्गत दर्यापूर शहरातील विविध ठिकाणी IEC अंतर्गत जन-जागृती करणे | २५०/- | १००/- |
| ३ | दर्यापूर शहरात सुशोभीकरण अंतर्गत I IOVE DARYPUR स्मारक उभारणे | १०००/- | ५००/- |
| ४ | स्वच्छ भारत अभियान व माझी वसुंधरा अंतर्गत टाकाऊ वस्तू पासून सुशोभीकरण चे वस्तू बनविणे | १०००/- | ५००/- |
| ५ | स्वच्छ भारत अभियान जन जागृती करिता पोस्टर बनर पुरवठा करणे. | १०००/- | ५००/- |
| ६ | न.प. मालकीच्या वाहनांकरीता टायर व बॅटरी पुरवठा करणे. | १०००/- | ५००/- |

| अ.क्र. | वितरण | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धा करणे | ११/१०/२०२४ | सकाळी १०.०० |
| २ | निविदा फॉर्म उपलब्ध होणे | ११/१०/२०२४ | सकाळी १०.०० |
| ३ | निविदा भरण्याची अंतिम तारीख | १७/१०/२०२४ | सायंकाळी ६.०० |
| ४ | निविदा उघडण्याची अंदाजित तारीख | १८/१०/२०२४ | दुपारी ४.०० |

अटी व शर्ती

१. उक्त नमूद कामामधील अनु. क्र. १ व २ हे काम केवळ न.प. दर्यापूर मध्ये नोंदणीकृत बचत गट करीता राखीव ठेवण्यात आलेले आहे.
२. उपरोक्त प्रमाणे नमूद कामाची निविदा कुठलेही कारण न देता रद्द करण्याचे किंवा निविदामधील अटी व शर्ती मध्ये बदल करण्याचे अधिकार मुख्याधिकारी नगर परिषद दर्यापूर यांनी राखून ठेवले आहे.
३. कामा संबंधित सर्व आवश्यक अटी व शर्ती निविदा फॉर्म सोबत जोडण्यात आल्या आहे.
४. निविदा द्वि-लिफाफा पद्धतीने सादर करणे बंधनकारक आहे. लिफाफा १ तांत्रिकबोली २. वित्तीयबोली लिफाफा.
५. अनामत रक्कम नगर परिषद निधि अंतर्गत भरणा करून छायांकित प्रत लिफाफा क्र. १ मध्ये जोडणे बंधनकारक आहे.

**( नंदू परळवार )**
**प्रशासक तथा मुख्याधिकारी**
**नगरपरिषद दर्यापूर**



## जाहीरनामा

**तहसिलदार नांदगाव खंडेश्वर कार्यालय ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती**

**क्र. रामाक्र/375/अमरावती/2024 दि. 11/10/2024**

याव्दारे सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार प्रतिभा अनिल खडसे, रा. जयराम नगर, अमरावती, ता. अमरावती जि. अमरावती (कु. प्रतिभा निळकंठ भेंडे - लग्नापुर्वीचे नाव) यांचा जन्म खिरसाना येथे दि. 04/12/1968 रोजी झाला असल्यामुळे, जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश मिळण्याबाबत प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

सदर बाबत कोण्या नागरिकांचे काही आक्षेप किंवा हरकत असल्यास 15 दिवसांचे आत आक्षेप व हरकती लेखी स्वरुपात आमचे समक्ष सादर करावे. मुदतीनंतर घेतलेले आक्षेप व हरकती यांचा विचार केला जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार**
**नांदगाव खंडेश्वर**



## जाहीरनामा

**तहसिलदार नांदगाव खंडेश्वर कार्यालय ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती**

**क्र. रामाक्र/376/वेणी गणेशपुर/2024 दि. 11/10/2024**

याव्दारे सर्व नागरीकांना सुचित करण्यात येते की, अर्जदार उषा राजेंद्र गोरले रा. वेणी गणेशपुर, ता. नांदगांव खंडेश्वर जि. अमरावती (कु. उषा निळकंठ भेंडे - लग्नापुर्वीचे नाव) यांचा जन्म खिरसाना येथे दि. 09/02/1965 रोजी झाला असल्यामुळे, जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश मिळण्याबाबत प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

सदर बाबत कोण्या नागरिकांचे काही आक्षेप किंवा हरकत असल्यास 15 दिवसांचे आत आक्षेप व हरकती लेखी स्वरुपात आमचे समक्ष सादर करावे, मुदतीनंतर घेतलेले आक्षेप व हरकती यांचा विचार केला जाणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

शिक्का

**तहसिलदार**
**नांदगाव खंडेश्वर**



## जाहीर नोटीस

सर्वत्र आम जनतेस या जाहीर नोटीसव्दारे सुचित करण्यात येते की, मला माझे पक्षकार शेख सालर शेख गफ्फार, वय-40 वर्षे, धंदा-शेती, रा. मालखेड रेल्वे, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांनी दिलेल्या माहितीवरून व प्रदान केलेल्या अधिकारावरून नोटीस देतो ती येणे प्रमाणे.

माझे पक्षकार यांनी श्री. ज्योतीराम भावडू शिंदे, वय 78 वर्षे, धंदा - शेती, रा. दहीगाव, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांच्या सोबत त्यांच्या मालकीची व ताब्यातील शेतजमिन विकत घेण्याचा सौदा पक्का केला आहे. शेतजमिनीचे वर्णन पुढील प्रमाणे

मौजा दहीगाव, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती येथील

1) गट क्र. 345, क्षेत्र. 4 हे. 64 आर. पैकी 1 हे. 17 आर., आकार रू. 1.97, भो. वर्ग 1

चतुः सिमा - **पुर्वस** - विशाल गवळी यांचे शेत, **पश्चिमेस** - अवधुत मेश्राम यांचे शेत **दक्षिणे** - रस्ता, **उत्तरेस** - रमेश मेश्राम यांचे शेत

येणे प्रमाणे वरील चतु सिमेतील 1 हे. 17 आर. शेतजमिन रू. 12,00,000/ - (अक्षरी बारा लक्ष रूपये) रूपयात विकत घेण्याचा सौदा पक्का केला आहे. त्या अनुषंगाने माझे पक्षकाराने दि. 04/09/2024 ला सदर शेताची इसारचिठ्ठी केली असुन सदर शेताची खरेदी दि. 04/12/2024 किंवा त्या पुर्वी करायचे ठरले आहे.

सदर शेतावर कोणाचा हक्क, अधिकार, उजर, बोझा, गहाण, कुळ असल्यास ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून 7 दिवसाचे आत माझे पक्षकारासोबत योग्य ते दस्तऐवज घेवून संपर्क करावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. तसेच माझे पक्षकार नियमाप्रमाणे खरेदी करून घेतील. त्यानंतर कोणाचाही कोणताही उजर ऐकुण घेतल्या जाणार नाही.

करिता ही नोटीस.
दि. 11/10/2024

शिक्का

**नोटीस देणार तर्फे अधिवक्ता**
**( ॲड. एल. एम. कदम )**
**चांदूर रेल्वे, मो. 9284365996**